# ग्रंथालयाचे कार्य

नवनवीन प्रकाशित होणारी उपयुक्त पुस्तके आणि इतर वाचनीय साहित्य इत्यादी प्राप्त करणे, त्यावर तांत्रिक सोपस्कार करणे, त्यातील माहितीच्या नोंदी ठेवणे, त्यांची देव-घेव करणे आणि त्यांचे जतन करणे व त्या साहित्याच्या आधारे दोन्ही सभागृहांचे सन्माननीय पीठासीन अधिकारी, सन्माननीय सदस्य व विधिमंडळाचे अधिकारी आणि कर्मचारी यांना आवश्यक असणारी माहिती अपेक्षित वेळेत पुरविणे हे या ग्रंथालयाचे मुख्य काम आहे.

- **कामाच्या वेळा :-**

नि:सत्र कालावधीत सकाळी १०.४५ ते सायंकाळी ०६.१५ या कार्यालयीन वेळेत व सत्र काळात सभागृहाचे कामकाज सुरू होण्यापुर्वी एक तास ते सायंकाळी सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत किंवा ०६.३० या दोन्हीपैकी जी वेळ नंतरची असेल त्या वेळेपर्यंत ग्रंथालय सेवा उपलब्ध असते.

- **कर्मचारी वर्ग :-**

ग्रंथालयामध्ये सध्या कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या एकूण २३ इतकी आहे. त्याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ➢ ग्रंथपाल, माहिती व संशोधन अधिकारी | : | ०१ |
| ➢ उप ग्रंथपाल (संदर्भ व संशोधन) | : | ०१ |
| ➢ उप ग्रंथपाल (ग्रंथालय व माहिती) | : | ०१ |
| ➢ तांत्रिक सहायक | : | ०४ |
| ➢ सहायक कक्ष अधिकारी | : | ०५ |
| ➢ लिपिक-टंकलेखक | : | ०५ |
| ➢ दफ्तरी | : | ०२ |
| ➢ शिपाई/मदतनीस | : | ०४ |
| एकूण | : | २३ |

- **वाचन कक्ष :**

सन्माननीय सदस्यांना त्यांच्या सभागृहातील भाषणांच्या तयारी करिता ग्रंथालयामध्ये बसून काही टिपणे काढता यावीत, अभ्यास करता यावा, संदर्भ पाहता यावेत जेणेकरून त्यांची सभागृहातील कामगिरी अभ्यासपुर्ण व उपयुक्त व्हावी या दृष्टीने सन्माननीय सदस्यांसाठी सुसज्ज, प्रशस्त व वातानुकुलीत अभ्यासिकाही संगणक व इंटरनेटच्या सुविधांसह ग्रंथालयाच्या ६ व्या मजल्यावर कक्ष क्र. ६०३ मध्ये उपलब्ध आहे. सन्माननीय सदस्यांनी अभ्यासिकेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा अशी अपेक्षा आहे.

- **ग्रंथालयामधून देण्यात येणाऱ्या संदर्भ सेवा :-**

**(अ) वृत्तपत्रे कात्रणे विभाग :**

सन्माननीय सदस्यांना सभागृहात विविध चर्चांमध्ये भाग घेताना सुविहितपणे व प्रभावीपणे काम करता यावे या दृष्टीने उपयुक्त असे संदर्भ मिळण्यासाठी वृत्तपत्रांतील बातम्या, लेख, अग्रलेख इत्यादी समाविष्ट असणारा वृत्तपत्रे कात्रणांचा विभाग आहे.

या ग्रंथालयात महाराष्ट्रातील बहुतेक सर्व प्रमुख वृत्तपत्रे व नियतकालिके येतात. त्यातील उपयुक्त बातम्या व लेखांची कात्रणे वेगळ्या कोऱ्या कागदावर चिकटवून, खास तयार केलेल्या वर्गीकरण पध्दतीप्रमाणे त्याला विषय क्रमांक देऊन, त्या त्या विषयाची कात्रणे त्या त्या विशिष्ट विषयांच्या फोल्डर्समध्ये एकत्रित ठेवण्यात येतात. प्रत्येक कात्रणावर वृत्तपत्राचे नाव, दिनांक, विषय क्रमांक यांची नोंद असते. ह्या विषयवार कात्रणांच्या संग्रहामुळे एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नासंबंधीची उदा. झोपडपट्टीची समस्या, महिलांवरील अत्याचार, राज्यातील कायदा व सुव्यवस्था, महागाईची समस्या, पाणीटंचाई, जलसंधारण, बेरोजगारी, सार्वजनिक वितरणप्रणाली, लोकसंख्या, शिक्षण, कृषी, व्यापार, समाजकारण, राजकारण इत्यादींची अद्ययावत माहिती सन्माननीय सदस्यांना तात्काळ उपलब्ध होते व त्याआधारे त्यांना आपला विषय सभागृहामध्ये वा सभागृहाच्या बाहेर ही अधिक प्रभावीपणे मांडण्यास निश्चितच मदत होते.

**(ब) कामकाजविषयक संदर्भ :**

अनेकवेळा सन्माननीय सदस्यांना सभागृहात निरनिराळ्या विषयांवर पूर्वी सभागृहामध्ये झालेल्या महत्त्वाच्या चर्चा, जसे अशासकीय ठराव, अविश्वासाचे ठराव, अल्पकालीन चर्चा, अर्धा-तास चर्चा, स्थगन प्रस्ताव, विधेयके, लक्षवेधी सूचना, महत्त्वाची निवेदने इत्यादींबाबत कार्यवाही वृत्तांतील माहितीची त्वरीत गरज असते. अशी माहिती सन्माननीय सदस्यांना त्वरीत उपलब्ध करून देण्यासाठी ग्रंथालयामध्ये त्या त्या विषयांच्या नोंदी समाविष्ट असणाऱ्या अद्ययावत फाईल्स तयार करण्यात आल्या आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना ही सेवा त्वरीत उपलब्ध करून देण्यात येते.

**(क) अद्ययावत महाराष्ट्र अधिनियम :**

विधिमंडळ ही कायदे संमत करणारी संस्था आहे. उपलब्ध सर्व अधिनियम अद्ययावत ठेवणे हे एक महत्त्वाचे तसेच एका दृष्टीने अतिशय तांत्रिक स्वरूपाचे असे हे काम आहे. मूळ अधिनियमात वेळोवेळी बदल किंवा सुधारणा करण्यात येतात आणि हे सर्व बदल किंवा सुधारणा मूळ अधिनियमात योग्य त्या ठिकाणी समाविष्ट करून तो अधिनियम सन्माननीय सदस्यांना संदर्भासाठी अद्ययावत ठेवणे अत्यंत आवश्यक असते. हे काम काटेकोरपणे व जागरूकतेने करावे लागते.

ग्रंथालयामध्ये "महाराष्ट्र अधिनियम" या कायद्याच्या संहितेच्या १ ते १० खंड अद्ययावत करण्यात येऊन संदर्भासाठी ठेवण्यात येतात. केंद्रीय अधिनियमांसाठी A.I.R (All India

Reporter) या प्रकाशनाच्या प्रती ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहेत. सदर संहिता सन्माननीय सदस्यांना ग्रंथालयात बसून पाहण्यासाठी उपलब्ध करून दिल्या जातात. सर्वोच्च व उच्च न्यायालयांच्या निर्णयांच्या डेटाबेस असलेले AIR SC (1950-2019), AIR HC (1985-2019) व SSC Online (1950-2019) हे तीन डेटाबेस ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

**(ड) संशोधकांना संदर्भ सहाय्य :**

एखाद्या विशिष्ट विषयाचा विशेष अभ्यास करणारे संशोधक किंवा पीएच.डी. चा अभ्यास करणारे संशोधक यांना त्यांच्या विषयांच्या अभ्यासासाठी लागणारे संदर्भ रितसर पूर्वमान्यता घेवून नि:सत्र कालावधीत त्यांच्यासाठी ग्रंथालयात उपलब्ध केले जाते.

- **"सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय" प्रकाशन :**

प्रत्येक विधानसभेच्या कालावधीकरिता सभागृहाच्या "सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय" हे प्रकाशन ग्रंथालयामार्फत काढण्यात येते. या प्रकाशनासाठी सन्माननीय सदस्यांची वैयक्तिक परिचय असणारी माहिती विहित प्रकारच्या फॉर्ममधून सन्माननीय सदस्यांकडून लेखी स्वरूपात मागविण्यात येऊन ती संक्षिप्त स्वरूपात संपादित केली जाते. विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांच्या बाबतीतही नियत कालावधीनंतर अशाच प्रकारची पुस्तिका प्रकाशित करण्यात येते. या प्रकाशनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना वितरीत करण्यात येतात.

- **शोक प्रस्ताव व अभिनंदनपर प्रस्ताव :**

दिवंगत सदस्य वा महनीय व्यक्तींच्या निधनाबद्दल सभागृहात सादर करण्यात येणाऱ्या शोकप्रस्तावांसंबंधीचे सर्व काम ग्रंथालय कक्षामार्फत करण्यात येते. तसेच प्रसिध्द व्यक्तींच्या गौरवपुर्ण कारकिर्दीबाबतचा अभिनंदनपर प्रस्तावही ग्रंथालयामार्फत घेण्यात येतो.